आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२ एप्रिल २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पेट्रोरासायनिक उत्पादनांवरचं सीमाशुल्क ३० जूनपर्यंत रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- २०२५-२६ या आर्थिक वर्षात संरक्षण उत्पादनांची ३८ हजार ४२४ कोटी रुपये इतकी विक्रमी निर्यात

- राज्यात ठिकठिकाणी हनुमान जयंती साजरी

**आणि**

- पुण्यासह राज्याच्या विविध भागांना अवकाळी पावसाचा तडाखा, १३ जिल्ह्यांना उद्यासाठी ऑरेंज अलर्ट

**<><><><><>**

महत्त्वाच्या पेट्रोरासायनिक उत्पादनांवर ३० जूनपर्यंत संपूर्णपणे सीमाशुल्क माफ केलं जाणार आहे, असं सरकारनं आज जाहीर केलं. यामुळे प्लास्टिक, वस्त्रोद्योग, औषधनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांना दिलासा मिळणार आहे. देशातली तेल शुद्धीकरण केंद्रं पूर्ण क्षमतेनं कार्यरत असून पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर ठेवण्यासाठी उत्पादन शुल्क कमी करण्यात आलं आहे. पुढच्या ६० दिवसांसाठी कच्च्या तेलाचा पुरवठा निश्चितपणे होणार आहे. इराणमधून सुमारे १२०० भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे आर्मेनिया आणि अझरबैजानमध्ये स्थलांतरित केल्याचं सरकारनं सांगितलं.

**<><><><><>**

भारतानं २०२५-२६ या आर्थिक वर्षात संरक्षण सामग्री उत्पादनांची ३८ हजार ४२४ कोटी रुपयांची विक्रमी निर्यात केली असून, गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यामध्ये १४ हजार ८०२ कोटी रुपये, म्हणजेच ६२ पूर्णांक ६६ शतांश टक्के इतकी वाढ झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

यात सार्वजनिक क्षेत्रातल्या उपक्रमांचा वाटा ५४ पूर्णांक ८४ शतांश टक्के, तर खासगी क्षेत्राचा वाटा ४५ पूर्णांक १६ शतांश टक्के आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या कामगिरीची प्रशंसा केली आहे.

<><><><><>

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस होता. लोकसभेत आज 'केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (सामान्य प्रशासन) विधेयक, २०२६' चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी मांडण्यात आलं. राज्यसभेत हे विधेयक यापूर्वीच मंजूर झालं होतं. गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी हे विधेयक मांडलं. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातले 'गट अ' सर्वसाधारण कर्तव्य अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांची भरती आणि सेवेच्या अटींशी संबंधित सर्वसाधारण नियमांचं नियमन करणं, हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे. चर्चेची सुरुवात करताना, काँग्रेसचे हरीशचंद्र मीना यांनी या विधेयकाला विरोध केला. हा विषय देशाच्या अंतर्गत सुरक्षेशी संबंधित असून, त्यावर सविस्तर चर्चा व्हायला हवी, असं ते म्हणाले. तर, सरकारने केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या प्रतिनिधीमंडळाशी सल्लामसलत न करताच हे विधेयक आणल्याचा आरोप समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव यांनी केला. पालघर जिल्ह्यातल्या तारापूर अणुऊर्जा केंद्राचं संवेदनशील स्वरूप लक्षात घेता, जिल्ह्यात २०० खाटांचं सुसज्ज ‘रेडिएशन आपत्कालीन रुग्णालय’ उभारण्यात यावं, अशी मागणी खासदार हेमंत विष्णू सवरा यांनी आज लोकसभेत केली. नियम ३७७' अंतर्गत, त्यांनी केंद्रीय गृह, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांचं या महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधलं.

<><><><><>

राज्यात आज हनुमान जयंती उत्साहात साजरी होत आहे. याविषयी ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून…

**<u>व्हीसी</u>**

पहाटे जन्मोत्सव साजरा केल्यानंतर भाविकांनी ठिकठिकाणच्या मंदिरांमध्ये दर्शनासाठी गर्दी केली आहे. समर्थ रामदास यांनी स्थापन केलेल्या ११ मारुती मंदिरांमधे तसंच

गावोगावी हनुमान मंदिरांमधे उत्सवाचं आयोजन केलं आहे. सांगली जिल्ह्यात बहे, तुंग आणि पुणदीसह अनेक ठिकाणी तर सोलापूर जिल्ह्यातल्या गौडगावच्या जागृत दक्षिणमुखी मारुती मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांसह पालखी काढण्यात आली. गोंदिया शहरातल्या हनुमान मंदिरातही भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. धुळे जिल्ह्यातल्या पांझरपोळ इथल्या हनुमान मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली. त्याचप्रमाणे बुलढाणा जिल्ह्यातल्या नांदुरा इथल्या १०५ फूट उंच हनुमान मूर्ती असून या ठिकाणीही सकाळपासूनच भाविकांनी एकच गर्दी केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला आणि गृहमंत्री अमित शहा यांनी देशवासियांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आज तिथीनुसार पुण्यतिथी आहे. यानिमित्त राज्यभरात शिवरायांना आदरांजली वाहण्यात येत आहे. अनेक नागरिकांनी आज दुर्गदुर्गेश्वर रायगडासह राज्यातील विविध गड-किल्ल्यांना भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं.

**<><><><><>**

**पुणे** शहर आणि परिसराला आज दुपारी मुसळधार पावसाचा तडाखा बसला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं. अनेक भागात ठिकठिकाणी पाणी साठलं. प्रमुख रस्त्यांवर वाहन कोंडी झाल्यानं अनेक ठिकाणची वाहतूक पर्यायी मार्गांनी वळवण्यात आली. पिंपरी चिंचवडमध्येही सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडला.

**सांगली** जिल्ह्यात पलूस, तासगाव, मिरज, खानापूर आणि वाळवा तालुक्यासह अनेक भागात मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात सह्याद्री पट्ट्यासह काही भागाला आज पुन्हा अवकाळी पावसाचा तडाखा बसला. भुईबावडा परिसरासह वैभववाडी तालुक्याला विजांच्या कडकडाटासह पावसानं झोडपलं. आंबा आणि काजू बागायतींचं मोठं नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**बुलढाणा** जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अवकाळी पावसाची शक्यता लक्षात घेऊन

शेतकरी आणि शेती उत्पादनावर आधारित पशुपालकांनी सतर्क रहावं अशा सूचना कृषी विभागानं दिल्या आहेत. **गडचिरोली** शहरासह जिल्ह्याच्या अन्य भागात मेघगर्जनेसह जोरदार पावसाने हजेरी लावली. जवळपास पावसामुळे मका पिकाचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. **अहिल्यानगर** जिल्ह्यात आज विविध भागात हजेरी लावली. नेवासे, शेवगाव, पाथर्डीत पावसामुळे मोठं नुकसान झालं. गेल्या दोन दिवसांपासून कोल्हापूर जिल्ह्यात अवकाळी पावसाने पुन्हा हजेरी लावली आहे. पालेभाज्या उन्मळून पडल्या आहेत. अनेक ठिकाणी गारपीट झाली आहे.

**<><><><><>**

राज्यात विविध ठिकाणी उद्यापर्यंत वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, बीड, जालना, पुणे, परभणी, हिंगोली, धाराशीव, लातूर छत्रपती संभाजीनगर या१३ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. याच जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे. संपूर्ण विदर्भ, पालघर, मुंबई, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर वगळता पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणासाठी हवामान विभागानं यलो अलर्ट दिला आहे.

येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा वाहील, असा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, अशी शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता इथल्या ईडन गार्डन्स मैदानावर कोलकाता नाईट रायडर्स आणि सनराईजर्स हैद्राबाद यांच्यात सामना होणार आहे. संध्याकाळी साडेसात वाजता सामना सुरु होईल.

कोलकाता नाईट रायडर्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

मंगोलियातल्या उलानबातर इथं आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत आज भारताच्या आदित्य प्रताप यादवनं उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात यादवनं सौदी अरेबियाच्या मौसा अलहॉसॉ याचा ५-० असा सपशेल पराभव केला. उपांत्य फेरीत यादवचा सामना अब्दुलो मादामिनव्हशी होईल.

<><><><><>

भोंदूबाबा अशोक खरातला नाशिकच्या न्यायालयाने आज एका गुन्ह्यामध्ये येत्या ८ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी दिली. खरातवर अनेक गुन्हे दाखल असून त्याला तीन वेळा पोलीस कोठडी मिळाली होती त्यानंतर काल एका प्रकरणात त्याला १४दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. मात्र, दुसऱ्या एका प्रकरणात आज पोलिसांनी त्याला हजर केल्यावर सत्र न्यायाधीशांनी ८ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडीचे आदेश दिले.

//<><><><><>//